महाराष्ट्र शासन

# संकटातून नवनिर्मितीकडे





**श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मा. मुख्यमंत्री

**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री

**श्री. बाळासाहेब थोरात**
मा. मंत्री, महसूल

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# संकटातून सुसंधी



**श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

'संकटातून नवनिर्मितीकडे' या पुस्तिकेतून महाविकास आघाडीने सर्वसामान्यांच्या हितासाठी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची एकत्रित माहिती मिळणार आहे. शासन विविध निर्णय घेत असते, त्याची माहिती लोकांपर्यंत विविध माध्यमांतून कल्पक आणि आकर्षकपणे पोहोचवणे हे काम तितके सोपे नाही. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे मी अभिनंदन करतो, कारण राज्य शासनाच्या निर्णयांची योग्य ती प्रसिद्धी करण्यात महासंचालनालयाने नेहमीच चांगले प्रयत्न केले आहेत. ही पुस्तिकादेखील याचाच एक भाग आहे.

पाहता पाहता आमच्या शासनाला येत्या काही महिन्यांतच एक वर्ष पूर्ण होईल. यातील अर्ध्यापेक्षा जास्त कालावधी कोरोनाच्या लढ्यात पार पडला. आणखी किती कालावधी आम्हाला या विषाणूशी लढावे लागणार ते माहीत नाही. राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प आम्ही मांडला, समाजातील अनेक घटकांसाठी यात चांगले निर्णय घेतले. दुर्दैवाने कोरोनाने आमचा वेग रोखला, पण त्यातून सावरून आम्ही राज्याच्या विकास चक्राला वेग देण्यास सुरुवात केली आहे.

मी या ठिकाणी अनेक निर्णयांचा अभिमानाने उल्लेख करू शकतो. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणारी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, शिवभोजन, सर्वसामान्यांना घरे, सर्व विभागीय आयुक्तालयात मुख्यमंत्री सचिवालये अशासारखे लोककल्याण हेच उद्दिष्ट असलेले निर्णय आम्ही घेतले.

आज कोरोनाशी गेल्या ५ महिन्यांपासून आम्ही लढतोय; पण प्रदीर्घ लॉकडाऊननंतर सर्व काही हळूहळू पूर्वपदावर आणताना उद्योग, आरोग्य, पायाभूत सुविधा, इतर विकास कामे, शिक्षण, शेती, पर्यटन यांच्याबाबतीत आम्ही काही धाडसी आणि आमूलाग्र बदल करणारे निर्णय घेतले. त्याची अंमलबजावणी लगेच सुरूही केली. संकटातून सुसंधी साधणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आमच्या शासनाने जी वाटचाल सुरू केली, ती देशालाही मार्गदर्शक ठरेल असा मला विश्वास वाटतो.

केवळ निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणेच महत्त्वाचे नाही तर ते लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे असते. त्यामुळे लोकांना, माध्यमांना तसेच प्रशासनाला देखील या सुंदर पुस्तिकेच्या माध्यमातून एकत्रित हे निर्णय वाचायला मिळतील, असा मला विश्वास वाटतो.

मी पुनश्च एकदा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रकाशन विभागाचे या पुस्तिकेसाठी मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि पुढेदेखील अशी उत्तमोत्तम प्रकाशने वाचायला मिळतील अशी आशा व्यक्त करतो.

# कोरोनामुक्तीचा लढा



**श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री

मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर वित्तमंत्री नात्याने राज्याचा अर्थसंकल्प मी विधिमंडळात सादर केला. त्या अर्थसंकल्पातून राज्याच्या विकासाची दिशा स्पष्ट केली. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच राज्यासमोर कोरोनाचे संकट उभे राहिले आणि प्राधान्यक्रम बदलले गेले. राज्यातील नागरिकांना कोरोनापासून वाचवण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्णय झाला. कोविडचा प्रसार रोखणे, कोविड रुग्णांना तातडीने उपचार उपलब्ध करण्यासाठी भौतिक साधनांसह मनुष्यबळ उभारण्यात आले. यामुळे राज्यातील कोरोना प्रसार आणि रुग्णसंख्या मर्यादित ठेवण्यात आपल्याला यशही मिळाले.

मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या महानगरात आणि विशेषत: धारावीसारख्या झोपडपट्टीत कोरोनाविरुद्धच्या लढाईला मिळालेल्या यशाची नोंद जागतिक पातळीवर घेण्यात आली. हे प्रशासकीय, वैद्यकीय यंत्रणेचे यश आहे. कोरोनाच्या लढाईत आरोग्य यंत्रणा भक्कम करीत असताना, राज्याच्या प्रगतीला खीळ बसता कामा नये, यासाठीही शासन प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीनेही अनेक निर्णय घेतले. शेतकऱ्यांसाठी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना लागू करून मर्यादित वेळेत तिची अंमलबजावणी केली. यंदा कापसाची विक्रमी खरेदी करण्यात आली. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी २०० कोटींहून अधिक रक्कम खर्च करून त्यांच्याकडील दूध खरेदी करण्यात आले. 'निसर्ग' चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत उपलब्ध करून दिली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी १ हजार २७३ कोटी तातडीने वितरित केले. एस.टी. महामंडळासाठी ५५० कोटी देण्याचा निर्णय घेतला. मराठा समाजबांधवांच्या 'सारथी' संस्थेला तातडीने ८ कोटी रुपये उपलब्ध करून दिले. आरोग्य विभागासाठी १७ हजार कर्मचारी तर, राज्य पोलीस दलात १२ हजार तरुणांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील रुग्णांसाठी १ हजार रुग्णवाहिका खरेदी केल्या जात आहेत.

महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत कोरोनावरील उपचारांची सोय सर्व नागरिकांना मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिवभोजन योजना तसेच कम्युनिटी किचन संकल्पनेंतर्गत नागरिकांना भोजन उपलब्ध करून देण्यात आले. पुणे शहर व जिल्ह्यातील कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू झाले आहेत. राज्य कोरोना संकटाशी एकजुटीने, निर्धाराने लढत असताना राज्याची आर्थिक, औद्योगिक, व्यापारी, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक परिस्थितीही पूर्वपदावर आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.

# धैर्य आणि आत्मविश्वास



**श्री. बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

गेल्या पाच महिन्यांपासून देशासह महाराष्ट्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला. आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या. यामुळे सगळे जनजीवन ठप्प झाले. अर्थचक्राची गती थांबली. पण या काळात धैर्य आणि आत्मविश्वासाने कोरोना संकटाचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज झाला.

मार्च महिन्यात आपल्या राज्यात केवळ दोन विषाणू चाचणी प्रयोगशाळा होत्या. पण राज्य सरकारने गतिमानतेने काम केल्याने आता आपल्याकडे १३०च्यावर प्रयोगशाळा झाल्या. अनेक ठिकाणी कोविड रुग्णालये उभारण्यात आली. औषधांचा व इतर आरोग्यविषयक साहित्यांचा पुरेसा साठा आपल्याकडे निर्माण झाला.

सर्वांच्या सहकार्याने आपण कोरोना विषाणूच्या संकटावर मात करण्यात यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे. तपासणीची संख्या वाढल्याने राज्यातील रुग्णांची संख्या अधिक दिसून येत असली तरी रुग्ण बरे होण्याचे प्रमाण हे ६८ टक्क्यांच्या आसपास पोहोचले आहे. या संकटावर मात करत असतानाच आपण 'मिशन बिगिन अगेन'च्या स्वरूपात अनलॉकिंगची प्रकिया सुरू केली. त्यामुळे दैनंदिन व्यवहार सुरळीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जीवनावश्यक दुकाने सुरू झाली आहेत. मर्यादित स्वरूपात प्रवासाला परवानगी देण्यात आली आहे. कारखाने सुरू होत आहेत. कामगार पुन्हा कामावर जाऊ लागले आहेत. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून डिजिटल पद्धतीच्या शैक्षणिक उपक्रमांना प्रारंभ करण्यात आला आहे. शासकीय व खासगी कार्यालये मर्यादित स्वरूपात सुरू झाली आहेत. सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये व त्यांना पुन्हा मोकळा श्वास घेता यावा यासाठी शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

कोरोनाच्या संकटकाळात महसूल यंत्रणेने आरोग्य यंत्रणेसोबतच रात्रंदिवस काम केले. कोरोना विषाणू प्रादुर्भावाचा सामना करण्याच्या या युद्धाचे व्यवस्थापन व संनियंत्रण महसूल यंत्रणेला करावे लागले. यात ही यंत्रणा कुठेही कमी पडली नाही. त्यामुळेच आज महाराष्ट्रात कोरोना विषाणू प्रादुर्भावाचा सामना अत्यंत चांगल्या पद्धतीने होत असल्याचे दिसून येते. याची दखल राष्ट्रीय पातळीवरसुद्धा घेण्यात आली आहे.

आता परिस्थिती रुळांवर येत असली तरी आपणास पुढील काळ अधिक सजग राहावे लागणार आहे. पुन्हा कोरोना विषाणू डोके वर काढणार नाही यासाठी सामाजिक अंतराचे नियम पाळणे, मुखपट्टी सतत लावणे आणि हातांची स्वच्छता करत राहणे यांसारख्या बाबींकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. त्याचे पालन करून आपण कोरोना संकटावर मात करू, असा मला विश्वास आहे.

# महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !

## मंत्री




**श्री. उद्धव ठाकरे**
मुख्यमंत्री



**श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री




**श्री. बाळासाहेब थोरात**
मंत्री, महसूल



**श्री. सुभाष देसाई**
मंत्री, उद्योग, खनिकर्म,
मराठी भाषा



**श्री. अशोक चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून)




**श्री. छगन भुजबळ**
मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व
ग्राहक संरक्षण



**श्री. दिलीप वळसे-पाटील**
मंत्री, कामगार,
राज्य उत्पादन शुल्क



**श्री. जयंत पाटील**
मंत्री, जलसंपदा व
लाभक्षेत्र विकास



**श्री. अनिल देशमुख**
मंत्री, गृह



**डॉ. राजेंद्र शिंगणे**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन



**श्री. राजेश टोपे**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व
कुटुंब कल्याण

मंत्री

# महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !



**श्री. नवाब मलिक**
मंत्री, अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता



**श्री. हसन मुश्रीफ**
मंत्री, ग्रामविकास



**डॉ. नितीन राऊत**
मंत्री, ऊर्जा



**प्रा. वर्षा गायकवाड**
मंत्री, शालेय शिक्षण



**डॉ. जितेंद्र आव्हाड**
मंत्री, गृहनिर्माण



**श्री. एकनाथ शिंदे**
मंत्री, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)



**श्री. सुनील केदार**
मंत्री, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण



**श्री. विजय वडेट्टीवार**
मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन



**श्री. अमित देशमुख**
मंत्री, वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य



**श्री. उदय सामंत**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण



**श्री. दादाजी भुसे**
मंत्री, कृषी, माजी सैनिक कल्याण



**श्री. संजय राठोड**
मंत्री, वने, भूकंप पुनर्वसन

## महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !

# मंत्री



**श्री. गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता



**ॲड. के.सी. पाडवी**
मंत्री, आदिवासी विकास



**श्री. संदिपानराव भुमरे**
मंत्री, रोजगार हमी, फलोत्पादन



**श्री. बाळासाहेब पाटील**
मंत्री, सहकार, पणन



**ॲड. अनिल परब**
मंत्री, परिवहन, संसदीय कार्ये



**श्री. अस्लम शेख**
मंत्री, वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास



**ॲड. यशोमती ठाकूर**
मंत्री, महिला व बालविकास



**श्री. शंकरराव गडाख**
मंत्री, मृद् व जलसंधारण



**श्री. धनंजय मुंडे**
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य



**श्री. आदित्य ठाकरे**
मंत्री, पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार

# राज्यमंत्री

## महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !



**श्री. अब्दुल सत्तार**
राज्यमंत्री, महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास, विशेष साहाय्य



**श्री. सतेज पाटील**
राज्यमंत्री, गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्य, माजी सैनिक कल्याण



**श्री. शंभुराज देसाई**
राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पणन



**श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू**
राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार



**श्री. दत्तात्रय भरणे**
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद् व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन



**डॉ. विश्वजीत कदम**
राज्यमंत्री, सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा



**श्री. राजेंद्र पाटील-यड्रावकर**
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य



**श्री. संजय बनसोडे**
राज्यमंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्ये



**श्री. प्राजक्त तनपुरे**
राज्यमंत्री, नगर विकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन



**कुमारी आदिती तटकरे**
राज्यमंत्री, उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क

# अनुक्रमणिका


## शेती व ग्रामविकास

| | |
|---|---|
| कृषी | १४ |
| फलोत्पादन | १७ |
| सहकार | १८ |
| पणन | २० |
| ग्रामविकास | २१ |
| मृद व जलसंधारण | २३ |
| पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय | २४ |
| मत्स्यव्यवसाय | २५ |
| पाणीपुरवठा व स्वच्छता | २५ |

## शिक्षण व युवक

| | |
|---|---|
| शालेय शिक्षण | २८ |
| उच्च व तंत्र शिक्षण | २९ |
| वैद्यकीय शिक्षण | ३१ |
| क्रीडा व युवक कल्याण | ३२ |

## सामाजिक घटक

| | |
|---|---|
| सामाजिक न्याय व विशेष साहाय्य | ३४ |
| महिला व बालविकास | ३६ |
| इतर मागास बहुजन कल्याण | ३७ |
| अल्पसंख्याक विकास | ३८ |
| आदिवासी विकास | ३९ |

## उद्योजकता

| | |
|---|---|
| उद्योग | ४२ |
| कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता | ४३ |
| कामगार | ४४ |
| रोजगार हमी | ४६ |

## कायदा व सुव्यवस्था

गृह ४८
विधी व न्याय ५०

## संरचनात्मक

सार्वजनिक बांधकाम ५२
नगरविकास ५३
गृहनिर्माण ५४
परिवहन ५६
पर्यटन ५७
जलसंपदा व लाभक्षेत्र विकास ५७
वने ५८
पर्यावरण आणि वातावरणीय बदल ६१
ऊर्जा ६२

## भाषा व संस्कृती

सांस्कृतिक कार्य ६४
मराठी भाषा ६४

## अन्न आणि आरोग्य

सार्वजनिक आरोग्य ६६
अन्न व औषध प्रशासन ७०
मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन ७१
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण ७२

## प्रशासन

महसूल ७४
वित्त व नियोजन ७४
संसदीय कार्य ७६
सामान्य प्रशासन ७६
माहिती तंत्रज्ञान ७७

# शेती
# व
# ग्रामविकास

## शेती व ग्रामविकास

### कृषी

- रब्बी हंगाम २०१९ साठी विमा कंपनीची नेमणूक होऊ न शकलेल्या १० जिल्ह्यांत व्यावहारिक धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत उपाययोजना करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यास मान्यता.
- शेतकऱ्यांसाठी २२०० कोटींचा स्मार्ट कृषी प्रकल्प. जागतिक बँकेचे ७० टक्के, सरकारचे ३० टक्के अर्थसाहाय्य, उपसमिती गठीत.



- मुख्यमंत्री शाश्वत सिंचन कृषी योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचन संचासाठी ८० टक्के अनुदान.
- शेतकरी संघटना आणि शासन चर्चेसाठी प्रथमच व्यासपीठाची उपलब्धता.
- तालुकास्तरावर शेतकरी समन्वय समिती व कृषी विभागाच्या कार्यालयामध्ये शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष स्थापन.

# शेती व ग्रामविकास

- शेतीत नवनवीन प्रयोग करून उत्पादन वाढवणाऱ्या विविध क्षेत्रांतील ३६०६ शेतकऱ्यांची रिसोर्स बँक तयार, त्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देणारे तालुकास्तरावर अभियान.
- शेतकऱ्यांना कृषी उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यासोबतच त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी 'एक दिवस शेतावर' या उपक्रमाचा प्रारंभ.
- खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना केवळ एकाच अर्जावर कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी 'महाडीबीटी पोर्टल'ची सुविधा उपलब्ध. सर्वच टप्प्यांवर मानवी हस्तक्षेप कमी होणार असल्याने योजनांमध्ये पारदर्शकता येणार.
- शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी कृषी यांत्रिकीकरणात नावीन्यपूर्ण उपकरणांचा अंतर्भाव करून 'लॅब ते लॅण्ड' अशा पद्धतीने कृषी क्षेत्राचा विकास करण्यावर भर.
- मालेगाव येथे राहुरी कृषी विद्यापीठांतर्गत कृषी विज्ञान संकुल निर्माण करून त्यात शासकीय कृषी महाविद्यालय, कृषी उद्यानविद्या महाविद्यालय व अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय.



- अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेतीतील विविध आव्हानांचा एकत्रितपणे सामना करत धोके कमी करणे आणि शेतीला शाश्वतता आणत जोड व्यवसाय करणे ही उद्दिष्टे समोर ठेवून देशात प्रथमच शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचा निर्णय.
- गटशेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संस्थात्मक पातळीवर संघटित करण्यासाठी छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य विकास अभियानांतर्गत २ लाख ८२ हजार शेतकऱ्यांना गटशेती प्रवर्तक प्रशिक्षण.

# शेती व ग्रामविकास

- २९८६ शेतकरी उत्पादक गट, आत्मा गट यांच्या माध्यमातून मोठ्या शहरांमधील सोसायट्यांमध्ये थेट शेतमाल विक्रीची आणि ऑनलाइन विक्रीची व्यवस्था, दररोज २० हजार क्विंटल विक्री.
- विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांच्या बांधावर नेण्यासाठी प्रयत्न, 'जे विकेल ते पिकेल' ही संकल्पना आता प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न.



- कोरोनामुळे खरीप हंगामासाठी खते, बियाणे शेतकऱ्यांच्या बांधावर देण्याचे नियोजन.
- लॉकडाऊनमधून शेतीविषयक साहित्याच्या दुकानांना वगळण्याचा निर्णय.
- खरीप हंगामासाठी १७ लाख क्विंटल बियाण्यांची उपलब्धता.
- कोरोनाच्या संकटकाळात चारही कृषी विद्यापीठांमधील शैक्षणिक गुणवत्ता अबाधित राखण्यासाठी संचालक शिक्षण समन्वय समितीद्वारे सत्रनिहाय परीक्षेकरिता कृती आराखडा.
- अमरावती आणि नागपूर जिल्ह्यातील काही भागांमध्ये टोळधाडीचा मुकाबला करण्यासाठी ड्रोनचा वापर.
- पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन वर्षांसाठी राबविण्यास मान्यता.
- पिकाची उत्पादकता, गुणवत्ता व शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ ही त्रिसूत्री अवलंबण्यास प्राधान्य देण्यासाठी 'कृषी संजीवनी सप्ताहा'चे आयोजन.


- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी व संलग्न अभ्यासक्रमांचे शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी सवलत.
- सेंद्रिय शेतीतून उत्पादित शेतमालाला मुंबईत विक्रीसाठी जागा.
- प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या माहितीतील त्रुटी दुरुस्तीसाठी विशेष मोहीम.
- शेतमजुरांना कौशल्य आधारित प्रशिक्षण कार्यक्रम, सुमारे १ लाख शेतमजुरांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट.
- लॉकडाऊन काळात शेतकऱ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण.
- औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्यांची विक्री व्यवस्था बळकट करून रानभाज्यांच्या संवर्धनातून आदिवासी बांधवांची समृद्धी ही संकल्पना राबविणार. यासाठी जागतिक आदिवासी दिनानिमित्त ९ ऑगस्ट रोजी राज्यात रानभाज्या महोत्सवाचे आयोजन.

## फलोत्पादन

- राज्य रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग लागवड योजना पुढे चालू ठेवण्यास राज्य शासनाची मंजुरी.
- राज्य रोहयोंतर्गत २०२०-२१ करिता फळबाग लागवड योजनेकरिता ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध.

## सहकार

- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीसाठी घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाचे पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ग्रामीण बँका, विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्याकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या थकबाकीची ३० सप्टेंबर २०१९ रोजी रक्कम प्रति शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत शासनाच्या वतीने भरण्याचा निर्णय. कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या थेट खात्यात ऑनलाइन पद्धतीने जमा, लॉकडाऊन कालावधीतसुद्धा या कर्जमुक्तीच्या अंमलबजावणीला गती, या योजनेंतर्गत सुमारे ३२ लाख पात्र खातेदार शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध, २० जुलै २०२० अखेर त्यापैकी २७.३७ लाख खातेदारांना १७ हजार ६४६ कोटी रुपये एवढ्या रकमेचा लाभ. अवघ्या दोन महिन्यात योजनेची अंमलबजावणी, यामुळे शेतकऱ्यांना चालू वर्षाच्या खरीप व रब्बी हंगामासाठी पीक कर्ज मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ.




- २०२०-२१ या वर्षातील खरीप हंगामासाठी ४५ हजार ७७८ कोटी रुपये एवढा लक्षांक निश्चित. त्यापैकी १ एप्रिल २०२० ते ३१ जुलै २०२० या कालावधीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व व्यापारी बँकांमार्फत सुमारे ३०.२० लाख शेतकऱ्यांना २२ हजार ७७० कोटी रुपये पीक कर्ज पुरवठा. यापैकी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत २१.३३ लाख शेतकऱ्यांना ११ हजार ५७८ कोटी रुपये पीक कर्ज पुरवठा. खरीप २०२० मधील पीक कर्ज वाटपाचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत जास्त.

# शेती व ग्रामविकास

- कोरोनामुळे निर्माण झालेले आर्थिक संकट विचारात घेऊन सहकारी पतसंस्थांना दिलासा देण्यासाठी थकीत कर्जाच्या एनपीए वर्गवारीसाठी सध्या असलेला ६ महिन्यांचा कालावधी ९ महिन्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय.
- नागरी सहकारी बँका व पतसंस्थांमार्फत विविध प्रकारचे व्यावसायिक व नोकरदार यांनी काही विशिष्ट परिस्थितीत कर्जाची विहित कालावधीत परतफेड न केलेल्यास थकीत कर्जाची वसुली होण्यासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू. या योजनेस ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थांची निवडणुका सहा महिने पुढे ढकलण्याचा निर्णय.
- सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करणे व वार्षिक साधारण सभा घेण्यास मुदतवाढ.
- साखर उद्योगाला आर्थिक मदतीसाठी आत्मनिर्भर योजना.
- ४४ साखर कारखान्यांतील १ लाख ४१ हजार ऊसतोडणी मजुरांना लॉकडाऊनच्या कालावधीत मूळगावी पोहोचवण्याची व्यवस्था.
- लॉकडाऊनच्या कालावधीत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत ७५ शेतकरी उत्पादक कंपन्या/सहकारी संस्थांच्या सहकार्याने ४१४ सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील १२ हजार सभासदांना माफक दरात थेट फळे व भाजीपाला पुरवठा.



## पणन

- महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्पास (Maharashtra Agribusiness Network -MAGNET) मान्यता - यामुळे फळे व भाजीपाला उत्पादनास मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन, या नेटवर्कमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रोत्साहन.
- कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत चालू राहणे व शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून बाजार समितीचे मुख्य आवार व उपबाजार चालू ठेवण्याचा निर्णय.
- लॉकडाऊन काळात थेट शेतकरी - थेट ग्राहक उपक्रम.
- २७ मार्च ते ३० जून २०२० या कालावधीत फळे व भाजीपाल्याची एकूण ३६०० मे टन विक्री. खरेदी-विक्रीसाठी पणन मंडळाच्या संकेतस्थळावरील bs.msamb.com हे पोर्टल कार्यान्वित, ३२५ आंबा उत्पादकांची नोंदणी, त्याद्वारे ६५,००० डझन आंब्याची विक्री.



- जानेवारी २०२० ते जून २०२० अखेर सुविधा केंद्रावरून ९९१२ मे टन शेतमाल आखाती व युरोपीय देशांमध्ये निर्यात.
- बाहेरील राज्यात पाठवण्यात येणाऱ्या भाजीपाला व फळे वाहतुकीस येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी कृषी पणन मंडळाच्या मार्केट यार्ड येथील मुख्यालयात २४ तास 'आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष' २७ मार्च रोजी सुरू, या नियंत्रण कक्षास २००० फोन कॉल प्राप्त.
- यंदा २१९.४९ लाख क्विंटल विक्रमी कापसाची खरेदी, गेल्या दहा वर्षांतील ही विक्रमी खरेदी. हंगाम २०१९-२० मध्ये एकूण १९० कापूस खरेदी केंद्रावर कापूस पणन महासंघाद्वारे कापूस खरेदी. कापूस पणन महासंघाद्वारे हंगाम २०१९-२० मध्ये ३.३३ लाख शेतकऱ्यांकडून कापसाची खरेदी, शेतकऱ्यांकडून एकूण ४६०० कोटी रुपयांची कापूस खरेदी.

## ग्रामविकास

- स्मार्ट ग्राम योजनेचे नाव आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना असे करण्याचा निर्णय. या योजनेतील बक्षिसांच्या रकमेत वाढ. तालुकास्तरावर चांगले काम करणाऱ्या गावांना १० लाखाऐवजी २० लाख रुपये, तर जिल्हास्तरावर चांगली कामगिरी करणाऱ्या गावांना ४० लाखाऐवजी ५० लाख रुपयांचा पुरस्कार देण्याचा निर्णय.
- मोठ्या गावांमध्ये सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापनासाठी शहरी दर्जाच्या सुविधा देण्याचा निर्णय.
- मोठ्या गावांना जिल्हा वार्षिक योजनेतून मिळणार २ कोटी रुपयांपर्यंत निधी.
- बचत गटांची ५० उत्पादने ॲमेझॉन आणि जीईएम या ई–कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध.
- ग्रामपंचायतींच्या उपसरपंचांना प्रथमच मानधन वितरित. उपसरपंचांच्या खात्यावर पहिल्यांदाच १५.७२ कोटी रुपये जमा.
- १५व्या वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना वितरित. बंधित निधी १४५६ कोटी रुपये व अबंधित निधी १४५६ कोटी रुपये वितरित.
- आदिवासी गावांच्या विकासासाठी पेसामधून १६० कोटी रुपयांचा निधी वितरित.



# शेती व ग्रामविकास

- जुनी निवृत्तिवेतन योजना लागू नसलेल्या जि.प. कर्मचाऱ्याचा सेवेत मृत्यू झाल्यास कुटुंबीयास १० लाख रुपये सानुग्रह अनुदान.
- ग्रामीण भागातील सुमारे ५ कोटी लोकांना प्रतिकारशक्ती वाढीसाठी अर्सेनिक अल्बम हे होमिओपॅथिक औषध व आयुर्वेदिक औषध मोफत देण्याचा निर्णय
- कोरोनामुक्तीसाठी काम करणारे ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आशा गटप्रवर्तक, स्त्री परिचर यांना १ हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान.



- कोरोनामुक्तीसाठी काम करणारे जि.प. अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका या सर्वांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण.
- कोरोनामुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनासाठी करवसुलीच्या टक्केवारीची अट शिथिल.
- मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलल्या. या ग्रामपंचायतींवर त्याच गावातील योग्य व्यक्तीची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय.

## मृद् व जलसंधारण

- मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेमधून करण्यात आलेल्या जलसंधारणाच्या कामांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी २ हजार ८१० कोटी रुपयांचा निधी, ८ हजार जलसंधारण योजनांच्या पुनरुज्जीवनाला प्राधान्य. सुमारे ९७ हजार प्रकल्पांना फायदा.



- कृषी विभाग व सर्व जिल्हा परिषदांकडील १५ हजार ९६० नादुरुस्त प्रकल्पांची दुरुस्ती करण्यासाठी विशेष मोहीम.
- निरा देवघर व गुंजवणी धरणाचे कालवे कार्यान्वित नसल्यामुळे विना वापर राहणारे पाणी समन्यायी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात निरा उजवा आणि डावा कालवा येथील लाभक्षेत्रास वाटप करण्याचा निर्णय, यामुळे दोन्ही कालव्यांच्या क्षेत्रात झालेले नागरीकरण, औद्योगिकीकरण, कृषिपूरक उद्योग, साखर कारखाने, फळबागांना फायदा होणार.
- जलसंधारण, जलसंपदा, कृषी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि जिल्हा परिषदांकडील सुमारे १६ हजार जलसंधारण प्रकल्पांची दुरुस्ती करून मूळ पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यात येणार.

## पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय

- कोरोनामुळे बाजारात पिशवीबंद दुधाच्या मागणीत घट आली असून त्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सहा कोटी लिटर दुधाचे रूपांतर दूध भुकटीत करण्याचा निर्णय. यासाठी १९० कोटी इतका निधी वितरित केला जाणार आहे.
- दुधातील भेसळ रोखण्यासाठी मोबाइल व्हॅन, क्यूआर कोडचा वापर. दुधाची जागेवर तपासणी आणि दर्जाबाबत खात्री करणे शक्य. क्यूआर कोडद्वारे दूध भेसळ करण्याऱ्यांवर जरब.
- लॉकडाऊन परिस्थितीमध्ये प्रतिदिन १० लक्ष लिटर अतिरिक्त दुधाचे भुकटीमध्ये रूपांतर करण्यास ३१ जुलै २०२० पर्यंत मुदतवाढ. योजनेंतर्गत ५० कोटी रुपयांचा निधी अंमलबजावणी यंत्रणेस वितरित.
- ४ कोटी लिटर दूध स्वीकृत करण्यास व त्यासाठी१२७ कोटी रुपये इतक्या रकमेच्या खर्चास मंजुरी.



- दूध भुकटी ही पॅकिंग करून अमृत आहार योजनेतील ६ लाख ५१ हजार मुलांना आणि १ लाख २१ हजार गरोदर, स्तनदा मातांना मोफत देण्याचा निर्णय.

## मत्स्यव्यवसाय

- मच्छिमार नौकांसाठीच्या डिझेल परताव्याच्या रकमेतून कर्जाची वसुली न करण्याचा निर्णय.
- तलाव ठेका रक्कम भरण्यास व मासेमारी परवान्यांच्या नूतनीकरणाला सहा महिन्यांची मुदतवाढ.
- एल.ई.डी. दिव्यांच्या साहाय्याने होणारी अवैध पर्ससीन मासेमारी तसेच प्रतिबंधित असलेल्या मांगूर माशाच्या उत्पादनाविरुद्ध कारवाई.
- लॉकडाऊन कालावधीत मासे, मत्स्यबीज व मत्स्यखाद्याचा समावेश अत्यावश्यक बाबींमध्ये करून वाहतुकीस परवानगी. मत्स्य व्यावसायिकांना मोठा दिलासा.



## पाणीपुरवठा व स्वच्छता

- ‘जल जीवन मिशन’अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला २०२४ पर्यंत, वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन, गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्यासाठी योजना राबवण्याचा निर्णय.
- ग्रामीण भागातील प्रत्येक घराला नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा.
- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेचा कालावधी ३१ मार्च २०२० रोजी संपुष्टात आल्याने मंजुरी देण्यात आलेल्या प्रगतिपथावरील व अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याकरिता या योजनेस दोन वर्षे (२०२०-२१ पर्यंत) मुदतवाढ.

# शेती व ग्रामविकास

- कोविड–१९चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अहमदनगर, बीड, बुलडाणा, धुळे, गोंदिया, हिंगोली, जळगाव, जालना, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, वाशिम, यवतमाळ, औरंगाबाद, अमरावती, अकोला, लातूर आणि सोलापूर अशा २७ जिल्ह्यांतील स्वच्छाग्रहींसाठी हातमोजे, सॅनिटायझर तसेच मास्क खरेदीसाठी प्रत्येकी दहा लाख रुपयांचे अर्थसाहाय्य.
- कोविड–१९ च्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागांतर्गत कार्यरत स्वच्छाग्रहींच्या नियुक्तीस एक वर्षाची मुदतवाढ.



# शिक्षण
# व
# युवक

## शालेय शिक्षण

दीक्षा ॲप

- शाळा बंद.. पण शिक्षण आहे.. या अभ्यासमालेच्या साहाय्याने 'दीक्षा' ॲप आधारित विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन करण्यासाठीचा उपक्रम गेले ३ महिने सलग सुरू.
- विद्यार्थ्यांच्या स्वयंशिक्षणासाठी पर्यायी शैक्षणिक दिनदर्शिका विकसित.
- जिओ टी.व्ही.वर चार माध्यमांमधून विद्यार्थ्यांसाठी इ.३ री ते इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रसारण.
- जिओ सावन या रेडिओ वाहिनीवर कार्यक्रम.
- पाठ्यपुस्तके १०० टक्के विद्यार्थ्यांना वितरित.
- यू-ट्यूब वाहिनीवर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे व्हिडिओ चॅनेल.



- सह्याद्री वाहिनीवर टीलीमिली हा शैक्षणिक कार्यक्रम इ.१ ली ते इ.८वीसाठी सुरू.
- शिक्षकांना घरातून विद्यार्थ्यांना अध्यापन करता यावे, यासाठी गुगल क्लासरूमची सुविधा.
- स्वयंसेवक, शिक्षक वाडी-वस्त्यांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न.
- कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर इयत्ता १ ली ते १२ वीचा इयत्ता व विषयनिहाय २५ टक्के पाठ्यक्रम कमी.
- गुगलच्या सहकार्याने गुगल क्लासरुम उपक्रम राबविणारे देशातील पहिले राज्य.

## उच्च व तंत्रशिक्षण

- उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील राष्ट्रभावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजवणे व देशाभिमानाचे संवर्धन करण्यासाठी विद्यापीठ आणि महाविद्यालयाची दैनंदिन सुरुवात राष्ट्रगीताने करण्याचा निर्णय.
- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठे आणि शासकीय/अशासकीय, अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था, तंत्रशिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अधिपत्याखालील शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था यामध्ये नामफलक मराठी भाषेत लावण्याचे निर्देश.
- 'मराठी भाषा गौरव दिन' महाविद्यालयांमध्ये साजरा करण्याचा निर्णय.




- मुंबई विद्यापीठावरील प्रशासकीय ताण आणि विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे, कल्याण या उपकेंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव.
- मुंबई विद्यापीठ फोर्ट कॅम्पस वारसा संवर्धनासाठी २०० कोटींचा निधी, हार्वर्ड तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या धर्तीवर फोर्ट कॅम्पसचा वर्ल्ड क्लास हेरिटेज सेंटर बनवण्याचा निर्णय.
- महाविद्यालयांमध्ये संतसाहित्याचा अभ्यासक्रम व पैठण येथे अध्यासन केंद्राची निर्मिती, वारकरी आणि संत वाङ्मयाचा एकत्रित अभ्यासक्रम तयार करण्यासाठी समिती गठीत.

## शिक्षण व युवक

- उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत व नव्याने नियुक्त होणाऱ्या अध्यापकांकरिता महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (Maharashtra State Faculty Development Academy) स्थापन व कार्यान्वित.
- ग्रंथालयांची नव्याने पडताळणी करण्याचा निर्णय.
- उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ३० वर्षे पूर्ण झालेली महाविद्यालये आणि वसतिगृहे यांच्या इमारतींचे संरचनात्मक लेखा परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट).
- कोरोनाची पार्श्वभूमी लक्षात घेता पदवीच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या परीक्षा रद्द.
- दोहा (कतार) येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्यातून शैक्षणिक केंद्र सुरू करण्यासाठी कतार शासनाशी सामंजस्य करार.



शिक्षण व युवक

## वैद्यकीय शिक्षण

- लातूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे 'विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था लातूर' असे नामकरण.
- देशात प्रथमच प्लाझ्मा थेरपीचा शासकीय महाविद्यालयातील सर्वात मोठा उपयोग बी.जी. मेडिकल (ससून) रुग्णालयात सुरू.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे देशात सर्वात मोठा प्लाझ्मा थेरपी प्रकल्प कार्यान्वित.
- कोरोना विषाणू प्रादुर्भावाचा सामना करण्यासाठी राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय तज्ज्ञ डॉक्टरांच्या टास्क फोर्सची निर्मिती.
- कोविड-१९ चाचणीसाठी विक्रमी वेळेत खासगी व शासकीय १४२ प्रयोगशाळांची उभारणी; आयुष प्रयोगशाळांना मान्यता.
- कोविड-१९साठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विलगीकरण कक्षाची निर्मिती.
- विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देऊन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या.



- लातूर येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विभागीय उपकेंद्राची स्थापना. यामध्ये आरोग्य सेवेतील तांत्रिक मनुष्यबळासाठी विविध अभ्यासक्रम सुरू करणार.
- धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू. या अभ्यासक्रमांच्या ४६ जागांमध्ये वाढ.

शिक्षण व युवक

## क्रीडा व युवक कल्याण

- संशोधन, प्रशिक्षण व कौशल्य विकास यामधील गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत.
- मिशन ऑलिंपिक योजनेंतर्गत आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तयारीसाठी ५२ खेळाडूंना २.५७ कोटी रुपये आर्थिक साहाय्य मंजूर.
- २०१९-२० या वर्षात राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केलेल्या व प्राविण्यप्राप्त अशा २५२६ खेळाडूंना १.६७ कोटी रुपये शिष्यवृत्ती वितरित.



# सामाजिक घटक

## सामाजिक घटक

# सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

- संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन, इंदिरा गांधी दिव्यांग निवृत्तिवेतन या पाच योजनांच्या राज्यातील ३५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना एप्रिल, मे व जून महिन्याचे मानधन एकत्रित देण्याचा निर्णय. त्यासाठी १२५७ कोटी ५० लक्ष निधी मंजूर.
- जवळपास २ लाख अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रीशिपची शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी ४६२.६९ कोटी रुपये २१ मे २०२० रोजी समाज कल्याण आयुक्तालयास वर्ग. पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत महाराष्ट्रातील सर्व उमेदवारांसाठी एम.पी.एस.सी. परीक्षेसाठी ऑनलाइन कोचिंग सुरू करण्याचा निर्णय.



- लॉकडाऊनच्या दुसऱ्या टप्प्यात १७ एप्रिल २०२० रोजी राज्याच्या विविध भागांत अडकलेल्या एक लाख ४१ हजार ऊसतोड मजुरांचे राज्यातील सर्वात मोठे यशस्वी स्थलांतर.
- नागरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत एकूण ३२८७ कामांना २६७३२.१८ लक्ष निधी मंजूर, १०६९२.८७ लक्ष निधी २६ मार्च २०२० पर्यंत वितरित.
- कर्णबधीर प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना कोविड-१९ची योग्य माहिती पोहोचवण्याच्या दृष्टीने सांकेतिक भाषेमध्ये व्हिडिओ निर्मिती.
- हालचाल करू न शकणाऱ्या दिव्यांग ज्येष्ठ नागरिकांसाठी जिल्ह्याच्या दिव्यांग कल्याण निधीतून एक महिन्याचे रेशन, आवश्यक किराणा तसेच आरोग्यविषयक जीवनावश्यक वस्तू यांचे किट वाटप करण्याचा निर्णय.

# सामाजिक घटक

- कोरोना विषाणू संसर्गाबाबत तत्काळ माहिती देण्यासाठी सर्व महानगरपालिका व जिल्हा समाज कल्याण कार्यालयांमध्ये दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष स्थापन.
- मुंबई, पुणे, बुलडाणा यांसह काही जिल्ह्यांमध्ये कम्युनिटी किचनच्या माध्यमातून हजारो दिव्यांग व एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिक यांना मोफत जेवण.



- दिव्यांग कर्मचाऱ्यांना कोविड विषाणूच्या बाधेची जास्त भीती असल्यामुळे शासकीय कार्यालयामधील उपस्थितीतून सूट देण्याचा निर्णय.
- शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही प्रवेश न मिळू शकलेल्या ११ वी व त्यापुढील उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या स्वाधार योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचा निर्णय. शहरापासून ५ कि.मी. हद्दीपर्यंत महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू असलेल्या योजनेतील सवलती आता १० कि.मी.पर्यंत वाढविण्याचा निर्णय.
- परदेश शिष्यवृत्तीसाठी ज्या शाखेत पदव्युत्तर प्रवेश त्याच शाखेचे पदवी शिक्षण अनिवार्य हा नियम रद्द.
- मुंबईस्थित पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयास विविध विकासकामांसाठी १२ कोटी ७९ लाख रुपये निधी मंजूर.
- पीएच.डी. व एम.फिलचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) कोरोनामुळे या वर्षी १०५ ऐवजी पात्र सर्व ४०८ विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय.
- जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीची संपूर्ण प्रक्रिया आता ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय.

## सामाजिक घटक

# महिला व बालविकास

- केंद्राने मंजुरी दिलेली, मात्र अद्याप सुरू होऊ न शकलेली ९८ अंगणवाडी आणि ७८५ मिनी अंगणवाडी केंद्रे सुरू करण्यास तसेच त्यामधील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदे भरण्यास मान्यता.
- ग्रामीण, नागरी, आदिवासी क्षेत्रातील खासगी जागेत भरणाऱ्या अंगणवाडी केंद्रांच्या जागाभाड्यात भरीव वाढ. ग्रामीण, आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडी, मिनी अंगणवाडी केंद्र– १००० रुपये,नागरी शेत्रातील (नगरपालिका, परिषद, महानगरपालिका)– ४००० रुपये, महानगर क्षेत्र– ६००० रुपये.




- अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या रिक्त पदांपैकी ५० टक्के पदे भरण्यास मान्यता.
- यशोदा माता अंगत–पंगत उपक्रम– गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता यांना अंगणवाडी केंद्रामध्ये अंगत–पंगत पद्धतीने सहभोजनाचा लाभ देणारी योजना.

सामाजिक घटक

## इतर मागास बहुजन कल्याण

- कोरोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत मराठा समाजातील विद्यार्थ्यांसह अनुसूचित जाती जमाती, इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती व भटक्या जमाती अशा सर्व घटकांतील विद्यार्थ्यांनाही जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अडचणी येऊ शकतात हे लक्षात घेऊन अशा सर्व घटकांतील विद्यार्थ्यांना ६ महिन्यांची जातपडताळणीसाठी मुदतवाढ.



- विविध शैक्षणिक संस्थांना शासनाकडून देय असलेल्या शिष्यवृत्ती न मिळाल्याच्या कारणाखाली विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द न करण्याचे शैक्षणिक संस्थांना शासनाचे आदेश.
- धनगर समाजातील लाभार्थ्यांसाठी असलेल्या गृहनिर्माण योजनेचे नामकरण आता 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना'.

## सामाजिक घटक

- बार्टी व सारथीच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी महाज्योती या संस्थेची निर्मिती. नागपूर येथे मुख्यालय.
- धनगर समाजाच्या विध्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे.
- राज्यात ओबीसी मुला–मुलींसाठी स्वतंत्र ७२ वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय. प्रत्येक जिल्ह्यात दोन वसतिगृहे.
- ओबीसींसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकुल योजना सुरू करण्याचा निर्णय.

## अल्पसंख्याक विकास

- डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेतून १२१ मदरशांना शिक्षकांच्या मानधनासाठी १.८० कोटी रुपये वितरित.



- राज्यातील शासकीय आणि खासगी ८४ आयटीआयमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वर्ग. ८ हजार ३४८ विद्यार्थ्यांना यंदा मिळणार प्रशिक्षण.
- राज्यातील १५ शासकीय पॉलिटेक्निकमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी यंदाही दुसऱ्या पाळीतील वर्ग.
- अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी राज्यात २३ ठिकाणी शैक्षणिक संकुलांमध्ये वसतिगृहे. प्रवेश प्रक्रिया होणार सुरू.
- २०२० वर्षाखेर प्रस्तावित असलेल्या पोलीस भरतीच्या तयारीसाठी अल्पसंख्याक तरुणांसाठी विविध जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण योजना.

## आदिवासी विकास

- कोविड-१९ संसर्गामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत राज्यातील आदिवासी कुटुंबांना न्यूक्लिअस बजेट योजनेअंतर्गत गटनिहाय आर्थिक मर्यादेची अट शिथिल, वित्तीय अधिकारात वाढ.
- प्रधानमंत्री वनधन विकास योजना राबविण्यास मान्यता. ५०० वनधन विकास केंद्रे स्थापन करण्याचे उद्दिष्ट.
- शबरी आदिवासी घरकुल योजनेत दिव्यांग लाभार्थ्यांना ५ टक्के आरक्षण, दिव्यांग महिलांना प्राधान्य.
- कोविड-१९ विषाणू संसर्गाच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील स्तनदा माता व अंगणवाडीतील बालकांना अमृत आहार योजनेतील अन्न शिजवून न देता ग्रामपंचायत स्तरावरील आहार समितीमार्फत कच्च्या धान्याच्या स्वरूपात उपलब्ध.

## सामाजिक घटक

- अनुसूचित जमातीतील कुटुंबांना रेशन कार्ड काढण्यासाठी येणारा खर्च न्यूक्लिअस बजेट योजनेतून करण्याचा निर्णय.
- लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या आदिवासी मजुरांना मूळ गावी पाठविण्यासाठी पुढाकार.



# उद्योजकता

# उद्योजकता

## उद्योग

- कोविड-१९च्या टाळेबंदीनंतर राज्यातील ६५ हजार उद्योगांना परवानगी, १६ लाख कामगार कामावर रुजू.
- परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन, १८ हजार कोटींचे गुंतवणूक करार.
- नवीन उद्योग सुरू करण्यासाठी महापरवाना पद्धत सुरू.
- माणगाव एमआयडीसीला मंजुरी, अद्ययावत फार्मा पार्क सुरू होणार.
- 'महाजॉब्स' पोर्टल आणि ॲप सुरू.




- एमआयडीसीच्या विविध शुल्क वसुलीस सहा महिन्यांची मुदतवाढ. उद्योगांसाठी एमआयडीसीची प्लग ॲण्ड प्ले सुविधा, तयार गाळे उपलब्ध.
- अन्नप्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन.
- उद्योगांसाठी चाळीस हजार एकर जमीन राखीव.
- औरंगाबाद जिल्ह्यात एमआयडीसीच्या वतीने २५० खाटांचे कोरोना रुग्णालय सुरू.
- मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत १२ कंपन्यांसोबत सहकार्य करार, १६ हजार कोटींची गुंतवणूक होणार.

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता

- तरुणांना रोजगार उपलब्धतेच्या अनुषंगाने विभागाचे नामकरण 'कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता' विभाग असे करण्याचा निर्णय.
- अर्थसाहाय्यित, स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्याच्या अनुषंगाने समिती गठीत.
- आयटीआय कर्मचाऱ्यांच्या बदल्या ऑनलाइन करण्याचा निर्णय.
- कोरोना संकटकाळात १७ हजार ७१५ बेरोजगारांना रोजगार उपलब्ध.
- कोरोनाकाळात २४ ऑनलाइन रोजगार मेळावे संपन्न.
- 'महास्वयम्' वेबपोर्टलवर कोरोना संकटकाळात १ लाख ७२ हजार रोजगार इच्छुकांची नोंदणी.
- व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे नाव आता 'कौशल्य विकास परीक्षा मंडळ' करण्याचा निर्णय.
- बेरोजगार तरुण, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षण आणि रोजगारविषयक मार्गदर्शनासाठी ऑनलाइन कौन्सिलिंगचे आयोजन.

महाकवच मोबाइल ॲप



# उद्योजकता

- विभागातील नावीन्यता सोसायटीमार्फत कोरोना रुग्णांच्या कॉन्टॅक्ट ट्रेसिंगसाठी 'महाकवच' मोबाइल ॲप, टेलिमेडिसिन हेल्पलाईन तसेच कोरोना प्राथमिक चाचणीसाठी सेल्फ असेसमेंट टूल विकसित. तसेच कोरोना संकटकाळात नावीन्यता सोसायटीमार्फत सीएसआरच्या माध्यमातून ५२ कोटींहून अधिक रकमेच्या मदतीची उभारणी आणि वाटप.
- तरुणांमधील कल्पकतेला चालना देण्यासाठी स्टार्टअपला प्रोत्साहन. नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताहात १६०० स्टार्टअप्सचा सहभाग. उत्कृष्ट २४ स्टार्टअप्सना मिळणार १५ लाख रुपयांपर्यंतची विविध शासकीय कामे.

## कामगार

- स्थलांतरित कामगार बेघरांना सुविधा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापन निधीतून खर्च करण्यास मान्यता.
- विस्थापित कामगारांच्या व्यवस्थेसाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर.



# उद्योजकता

- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांना दोन हजार रुपयांच्या आर्थिक साहाय्याची रक्कम थेट बँक खात्यात.
- उद्योजकांसाठी बाष्पके संचालनालयाचा पुढाकार. ड्रॉईंग बाष्पके व आरेखन मान्यतेसाठी www.mahaboiler.in ऑनलाइन सुविधा सुरू.



- कारखाने अधिनियम, दुकाने व आस्थापना आणि इतर विविध कामगार अधिनियम एकत्रित वार्षिक विवरणपत्र दाखल करण्यासाठी मुदतवाढ.
- लॉकडाऊनच्या काळात परराज्यातील कामगारांसाठी राज्यभरात विशेष ट्रेनची सुविधा.

# उद्योजकता

- सुरक्षा रक्षकांना एप्रिल महिन्यात १००० रुपये अतिरिक्त वाहन भत्ता. मे महिन्यात अतिरिक्त भत्ता देण्यासंदर्भात कामगार सुरक्षा मंडळाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याची शासनामार्फत परवानगी.
- लॉकडाऊन काळात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या अधिपत्याखालील बाष्पके संचालनालय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या अधिकारी व माथाडी कामगारांना आंतर जिल्हा प्रवास करण्यास परवानगी.
- राज्यात कोविड–१९चा प्रादुर्भाव प्रभाव लक्षात घेता तसेच लॉकडाऊन कालावधी लक्षात घेऊन राज्यातील कारखान्यांना सूट. कारखान्यांकडे उपलब्ध असलेल्या कामगारांची संख्या लक्षात घेऊन कामाचे तास ठरवण्याची परवानगी.
- कामगार विभागांतर्गत नोंदणीकृत सुरक्षारक्षक व माथाडी कामगारांचा अत्यावश्यक सेवेतील घटक म्हणून समावेश करण्याचा निर्णय.
- कोविड –१९ संकटाच्या पार्श्वभूमीवर घटकाला ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण. १ लाख २८ हजारांहून अधिक माथाडी कामगारांना लाभ.

## रोजगार हमी

- राज्यात कोविड–१९च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या असाधारण स्थितीत मजुरांना काम उपलब्ध करून देण्यास प्राधान्य. टाळेबंदी कालावधीत राज्यात ५५,११८ कामे, ७,०४,७३२ मजुरांना रोजगार.

# कायदा व सुव्यवस्था

# कायदा व सुव्यवस्था

## गृह

- पोलीस कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कोविड सेंटर स्थापन.
- पोलिसांना विविध कोविड रुग्णालयांमध्ये तातडीने उपचार मिळावेत, याकरिता कोविड–१९ हेल्पलाइन जिल्हानिहाय सुरू.
- कोविड संसर्गामुळे मृत्यू झाल्यास कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबास ६५ लाखांचे अनुदान.
- मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोविड–१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत सेवा निवासस्थाने त्यांच्याकडे ठेवण्याची मुभा.



- ताप तपासणी केंद्र (Fever checking centre) – कोविड–१९च्या संदर्भात काही लक्षणे दिसल्यास अथवा शंका आल्यास मुंबईत महानगरपालिकेच्या सहकार्याने पोलिसांसाठी दोन ठिकाणी ताप तपासणी केंद्रे सुरू.



- महाराष्ट्र पोलीस कुटुंब योजनेंतर्गत राज्यातील नामांकित रुग्णालयात कोविड–१९साठी रोकडविरहित उपचार.
- पोलीस दलामध्ये विविध पदांवर जवळपास १२ हजार पदांची भरती प्रक्रिया डिसेंबरअखेर पूर्ण करण्याचा निर्णय.

- ५० वर्षांवरील १२ हजार पोलीस कर्मचाऱ्यांना जनतेशी संपर्क येईल अशी कोणतीही कामे न देण्याचा निर्णय, ५५ वर्षांवरील २३ हजार पोलिसांना कोणत्याही प्रकारे पगारात कपात न करता रजा घेण्याची परवानगी.

## विधी व न्याय

- ठाणे येथे अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय स्थापण्यास मंजुरी.
- राज्यातील वैवाहिक व कौटुंबिक वादाची प्रकरणे निकाली काढण्याकरिता कौटुंबिक न्यायालयांची असलेली आवश्यकता विचारात घेता लातूर, बीड, जालना, उस्मानाबाद व परभणी येथे स्थापन करण्यात आलेल्या कौटुंबिक न्यायालयांना ज्या दिनांकास ती सुरू झाली, तेथून पुढे ५ वर्षांच्या कालावधीसाठी मंजुरी देण्याचा निर्णय.



# संरचनात्मक

## सार्वजनिक बांधकाम

- ससून रुग्णालयात मेडिकल गॅस पाईपलाईनचे काम विक्रमी ११ दिवसात पूर्ण.
- कोरोनाविरुद्धच्या लढ्यात वैद्यकीय उपचारासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ४३ हजार १४० खाटांची सुविधा असलेल्या १२ हजार २८५ खोल्यांचे बांधकाम केले आहे. त्यामध्ये ७६२ वॉर्ड, ऑक्सिजन सुविधा असलेले १०६३ खाटांचा समावेश आहे.
- राज्यात मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, जळगाव, धुळे, चंद्रपूर, गोंदिया, औरंगाबाद, नांदेड, लातूर, बीड या जिल्ह्यांत १६ प्रयोगशाळांची निर्मितीचे काम सुरू असून काही पूर्ण करण्यात आल्या आहेत.
- नागपूरमध्ये फक्त ३० दिवसांत १२८० खाटांचे सुसज्ज रुग्णालयाची उभारणी. यामध्ये सर्वसाधारण उपचारासाठी खाटांची सोय, कोविड रुग्णांसाठी अतिदक्षता विभाग, मेडिकल गॅस पाईपलाईन, जुन्या वॉर्डाचे नूतनीकरण करण्यात आले.
- राज्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी नगरपंचायत व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील भूधारक आणि ग्रामीण क्षेत्रातील भूधारकांना देण्यात येणाऱ्या मोबदल्यामधील तफावत दूर करण्याचा निर्णय. नव्याने झालेल्या तसेच अविकसित नगरपंचायत व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील भूसंपादनासाठी ग्रामीण भागाप्रमाणेच वाजवी मोबदला.
- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ना देय प्रमाणपत्रासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित.
- राज्य महामार्गावर शौचालय, रेस्ट रूम, आदी सुविधा देण्याचा निर्णय.

- महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे 'हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नामकरण करण्याचा निर्णय.
- न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी सॉफ्टवेअरची निर्मिती.
- पुलांच्या देखभाल, दुरुस्ती व पुनर्निर्माणासाठी नियमावली विकसित.

## नगरविकास



- इंदू मिल येथील स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची ३५० फूट इतकी होणार. त्यामुळे स्मारकाचा चबुतरा १०० फूट व पुतळा ३५० फूट अशी स्मारकाची एकूण उंची जमिनीपासून ४५० फूट इतकी होणार. या कामाचा समन्वय सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग करणार.
- नगर परिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीऐवजी एकसदस्यीय प्रभाग पद्धत.
- नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांची निवड निर्वाचित नगरसेवकांमधून करण्यात येणार
- आकृतिबंध सुधारित करून नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे बळकटीकरण.
- कल्याण-डोंबिवली मनपा हद्दीतून वगळलेल्या १८ गावांची नगर परिषद.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड महापौर, उपमहापौर निवडणुका पुढे ढकलल्या.

- नगरविकास विभागाच्या माध्यमातून कोरोनावरील उपचारांसाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये, विशेषतः मुंबई आणि एमएमआर प्रदेशात आरोग्याच्या जम्बो सुविधांची निर्मिती.
- ठाण्याच्या क्लस्टर योजनेला अंतिम मंजुरी.
- महापालिका निवडणुकांमधील पॅनल पद्धत रद्द.
- नगर परिषदांमधील नगराध्यक्ष निवडणूक थेट पद्धतीने करण्याऐवजी नगरसेवकांमधून नगराध्यक्षांची निवड करण्याचा निर्णय.

## गृहनिर्माण

- चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी आणि पोलिसांसाठी 'म्हाडा'च्या सोडतीमध्ये प्रत्येकी दहा टक्के घरे राखीव.
- बृहन्मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील पुनर्वसन सदनिकांच्या क्षेत्रफळाप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे क्षेत्रफळ २६९ चौरस फुटांवरून ३०० चौरस फूट करण्याचा निर्णय.
- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडीधारकांच्या पात्रतेसंदर्भात एकाच केंद्रीय यंत्रणेमार्फत परिशिष्ट – २ तयार करण्याचा निर्णय. यामुळे पात्र झोपडीधारकांची अंतिम यादी सुनिश्चित करण्यामध्ये होत असलेला विलंब टळून पुनर्वसन प्रकल्प नियोजित वेळेमध्ये पूर्ण होण्यास साहाय्य.



- रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती देण्यासाठी व त्यासाठी लागणाऱ्या निधीसाठी स्ट्रेस फंड. या माध्यमातून पुनर्वसन सदनिकांच्या बांधकामासाठी बँकांकडून विकासकाला कर्जाची उपलब्धता व योजना गतीने पूर्ण करणे शक्य.
- प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सार्वजनिक आरोग्य केंद्र अनिवार्य.
- भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर प्रकल्पग्रस्त सदनिका महिन्याच्या आत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे विकासकाला बंधनकारक.
- म्हाडा वसाहतीचे अभिन्यास मंजुरीकरिता गती देण्यासाठी ४५ दिवसांमध्ये विकासकाला अंतिम निर्णय कळविण्याचा निर्णय.
- मुंबई महानगर वगळता मुंबई महानगर क्षेत्रातील महानगरपालिका आणि नगरपालिका मिळून स्वतंत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना.
- मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील 'म्हाडा' वसाहतीतील समूह विकासाचा प्रत्येकी एक प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश. यामुळे परवडणारी घरे व सुसज्ज सार्वजनिक सोयी-सुविधांची उपलब्धता होणार.
- मुंबईतील कामाठीपुऱ्याचा समूह पुनर्विकास.
- राज्यातील प्रमुख शहरे व महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवण्याचा निर्णय.
- गिरणी कामगारांना घरे.

## संरचनात्मक

### परिवहन



- कोविड–१९च्या संकटामध्ये मुंबईतील अत्यावश्यक सेवा देणाऱ्या डॉक्टर, परिचारिका, पोलीस, सफाई कर्मचारी इ. लोकांसाठी वाहतूक व्यवस्था.
- परराज्यातील श्रमिक मजुरांना एसटीचा आधार – ९ मे पासून ३१ मेपर्यंत ४४ हजार १०६ बसेसद्वारे सुमारे ५ लाख ३७ हजार ५९३ स्थलांतरित मजुरांना त्यांच्या राज्यात जाण्यासाठी महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत एस.टी. बसची सोय उपलब्ध.
- कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एस.टी.) महामंडळास प्रवासी वाहनांमधून मालवाहतूक करण्यास परवानगी. राज्यभर माफक दरात, वेळेत व सुरक्षित मालवाहतूक सेवेचा विस्तार.
- कोरोना महामारीचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने रेड झोन व कंटेनमेंट झोन वगळता राज्यातील इतर विभागामध्ये काही अटी–शर्तींच्या अधीन राहून २२ मेपासून जिल्हा–अंतर्गत एस.टी. बससेवा सुरू.
- १२ वीनंतरच्या विविध प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी राजस्थानातील कोटा येथे वास्तव्यास गेलेल्या १४०० विद्यार्थ्यांना एस.टी.च्या ७२ बसेसद्वारे महाराष्ट्रातील त्यांच्या मूळ गावी सुखरूप पोहोचवण्यात आले.
- अत्यावश्यक सेवा देणाऱ्या बँका व इतर संस्थांना त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी बसेसची सुविधा.
- ग्रामीण भागात कोरोनाबाधित रुग्णांची वाहतूक.
- लॉकडाऊनमुळे हंगाम संपण्यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात अडकलेल्या सुमारे १००० ऊसतोड मजुरांना ४८ बसेसमधून त्यांच्या मूळ गावी पोहोचवण्यात आले.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेला कोविड–१९ रुग्णांची वाहतूक करण्यासाठी १२ एस.टी. बसेसचे रूपांतर रुग्णवाहिकेत करून दिले.

संरचनात्मक

## पर्यटन

- कोकणच्या विकासाला चालना देणारे बीच शॅक धोरण जाहीर. स्थानिकांना ८० टक्के रोजगार देणे आवश्यक.
- मुंबईत पर्यटन आणि रोजगाराला चालना देण्यासाठी काही ठरावीक ठिकाणी, मिल्स कंपाउंड इत्यादी क्षेत्रात रात्रजीवन (नाईट लाईफ)ला संमती.
- मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे ॲक्वेरियम बनवण्याचा निर्णय.
- वन पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन आणि वन महामंडळाची समिती गठीत.
- लंडन आयच्या धर्तीवर मुंबईत मुंबई आयची निर्मिती करण्याचा निर्णय.
- मुंबई विद्यापीठ परिसराचा हेरिटेज विकास करण्याचा निर्णय.
- गेट वे ऑफ इंडियासह मुंबईतील विविध स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याचा निर्णय.



## जलसंपदा व लाभक्षेत्र विकास

- कृष्णा व भीमा नदी खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र व कर्नाटक राज्याची संयुक्त समिती स्थापण्याचा निर्णय.
- क्षारपड जमिनीचे भू सुधारण्यासाठी खासगी उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून सर्वेक्षण करून उपाययोजना राबवणार.

## संरचनात्मक

### वने

- सामूहिक पातळीवर ठोस वृक्षारोपण, वनीकरणाचा कार्यक्रम राबवण्यासाठी ३५० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद.
- २०१९-२०साठी पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरण (कॅम्प)अंतर्गत कामांसाठी १५१ कोटी रुपयांची तरतूद. याअंतर्गत ग्रामीण भागातील वणवा प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना, गॅस वाटप, जलसंधारणाची कामे करणे यांना प्राधान्य.
- पश्चिम घाट जैवविविधता संरक्षणांतर्गत मेळघाट येथे सायकल बुकिंग केंद्र व होम स्टे प्रकल्प.



# संरचनात्मक



- चंद्रपूर वन ॲकॅडमी, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र व बॉटनिकल गार्डनचे बळकटीकरण.
- यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्याचे रूपांतर व्याघ्र प्रकल्पात करण्याबाबत नव्याने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना.
- वनातील आग प्रतिबंधक उपाययोजनांसाठी नवीन ॲपची निर्मिती.
- बांबू निष्कासनाची कामे जंगल कामगार सहकारी संस्थांना देण्याचा निर्णय.
- व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान नियामक मंडळाद्वारे व्याघ्र प्रकल्पात भरीव काम करण्याचे उद्दिष्ट (सह्याद्री व्याघ्र प्रकल्प – कुरण विकास, तृणभक्षक प्राणी व वाघांच्या हस्तांतरणाची तयारी, परिरक्षणावर भर. मेळघाट व्याघ्र प्रकल्प – स्पायडर संग्रहालय खुले करणे. ताडोबा व्याघ्र प्रकल्प – यू–ट्यूबवरील ऑनलाइन सफारीला व्यापक प्रसिद्धी. पेंच व्याघ्र प्रकल्प – विद्यार्थी पर्यटनवाढीला प्राधान्य.)
- नगर वन उद्यान योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय.
- महानगरपालिका क्षेत्रात वन जमिनीवर २० हेक्टर ते १०० हेक्टरमध्ये ही योजना राबवण्याची संकल्पना.

# संरचनात्मक

- ११ शहर वन उद्यानांचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर.
- हरित महाराष्ट्र अभियान व वन महोत्सवाचे १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत आयोजन.
- नागपूर येथील गोरेवाडा येथे मृगया चिन्हे जतन करण्याचा प्रकल्प.
- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विकासासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याचा निर्णय.
- खासगी व स्वयंसेवी संस्थामार्फत अवनत वन क्षेत्राचे वनीकरण करण्याचा निर्णय.
- महिला बचत गटांसाठी नागपूर येथील सेमिनरी हिल येथे वन अमृत उपजीविका प्रकल्प.
- महिलांच्या रोजगार वृद्धीसाठी उपयुक्त.
- प्रत्येक जिल्ह्यात वन्य प्राण्यांच्या उपचारासाठी एक ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर (वन्यप्राणी तात्पुरते उपचार केंद्र).
- जैविक वारसा क्षेत्रे निर्मितीचा निर्णयानुसार गणेशखिंड गार्डन, पुणे येथील ३३.०१ हेक्टर क्षेत्र व लांडोरखोरी जळगाव येथील ४८.०८ हेक्टर क्षेत्र जैविक वारसा क्षेत्र म्हणून घोषित करण्याची अधिसूचना जारी.
- व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीवांची काळजी घेणे व त्यांना योग्य उपचार उपलब्ध करून देण्यासाठी सहा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची (गट–अ) नव्याने पदे भरण्यासाठी मंजुरी.
- मानव व बिबट्या सहसंबंध अधिक समजून घेण्यासाठी वन विभाग व वाईल्ड लाईफ कंझर्वेशन सोसायटी इंडियामार्फत संयुक्तपणे अभ्यास करण्याचा निर्णय.
- 'सफेद चिप्पी' महाराष्ट्र राज्य कांदळवन वृक्ष घोषित.
- आंग्रीया पठाराला नियुक्त क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्याची शिफारस.

- चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांच्या स्थलांतराचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन.
- राज्य मंत्रिमंडळाच्या विचारार्थ येणाऱ्या प्रस्तावासाठी ड्रोन सर्व्हे आवश्यक.
- प्रत्येक वनवृत्तात तात्पुरते वन्यजीव उपचार केंद्र.
- जैविक वारसा क्षेत्र निर्मितीच्या निर्णयानुसार गणेशखिंड गार्डन पुणे येथील ३३.०१ हेक्टर क्षेत्र व लांडोरखोरी, जळगाव येथील ४८.०८ हेक्टर क्षेत्र जैविक वारसा क्षेत्र म्हणून घोषित करण्याची अधिसूचना अंतिम टप्प्यात.

## पर्यावरण आणि वातावरणीय बदल

- पर्यावरण विभागाचे नामकरण करून आता 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग' असा बदल करण्याचा निर्णय.
- मुंबईतील माहुल भागामधील प्रदूषण नियंत्रणासाठी पहिल्या टप्प्यात या भागातील ३०० घरांचे पुनर्वसन.
- पर्यावरण मंत्री यांच्या पाठपुराव्यामुळे ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळील खाण साईटचा लिलाव रद्द करण्याचा केंद्र शासनाचा निर्णय. यामुळे वन्यजीव कॉरिडॉरचे संरक्षण झाले.



## संरचनात्मक

- निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांवर पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग कार्य करणार.
- जनजागृती व शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे जनमानसात त्यांच्या कृतीद्वारे भवताल अधिक समृद्ध करण्यासाठी प्रयत्न.
- निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्चित करण्यासाठी या वर्षी विभागामार्फत १०० कोटी रुपये निधी उपलब्ध.
- संपूर्ण महाराष्ट्र राज्य सिंगल युज प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार.
- महामार्गाच्या कामात येणारा सांगली जिल्ह्यातील ४०० वर्षांपूर्वीचा वटवृक्ष वाचविण्याचा निर्णय. राज्याचा समृद्ध वारसा आणि पर्यावरण जतनासाठी कटिबद्ध.

## ऊर्जा

- ऊर्जा विभागाच्या शासकीय कंपन्यांना कर्ज उभारणीसाठी शासन हमी.
- कोस्टल गुजरात पॉवर कंपनीकडून वीज खरेदीस मान्यता.
- राज्यातील उद्योगांना वीज शुल्कात सवलत.



# भाषा व संस्कृती

# भाषा व संस्कृती


## सांस्कृतिक कार्य



- महाराष्ट्र राज्याचा हीरक महोत्सव थाटात साजरा होणार. राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- मौजे शिरोडा वेळागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्रासाठी ताज ग्रुपला भाडेपट्ट्याने जमीन.
- रत्नागिरी जिल्ह्यातील १७ गावांमध्ये विखुरलेल्या इतिहासपूर्वकालीन कातळ शिल्पांच्या जतन आणि संवर्धनाच्या कामाला मान्यता.
- राज्य शासनाचा २०१८-१९चा तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार गुलाबबाई संगमनेरकर, राज्य शासनाचा संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार मधुवंती दांडेकर, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार स्व. रत्नाकर मतकरी यांना जाहीर.
- लॉकडाऊन काळात चित्रपटसृष्टीतील विविध कामांना मार्गदर्शक तत्त्वांसह शासनाची मान्यता; अटी-शर्तींसह चित्रीकरणासही मान्यता.
- राज्यातील सुमारे २९ हजार बृहद साहित्यिक व कलावंतांचे मानधन अदा करण्याचे प्रयत्न.  मार्च, एप्रिल या दोन महिन्यांचे मानधन अदा.

## मराठी भाषा

- महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी कायदा.
- शालेय शिक्षण विभागामार्फत कायद्याची अंमलबजावणी.



# अन्न आणि आरोग्य

## सार्वजनिक आरोग्य

- शासकीय व अनुदानित शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांमधील दृष्टिदोष निवारण्यासाठी मोफत चष्मे.
- प्राथमिक आरोग्य सुविधा बळकटीकरणावर भर, मार्चअखेर ६५०० आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यान्वित.
- हृदयविकारामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी राज्यात 'स्टेमी' (ST Elevation in Myocardial Infarction) प्रकल्प, पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांमध्ये प्रकल्प. या प्रकल्पाच्या माध्यमातून हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांना गोल्डन अवरमध्ये उपचाराची सुविधा.
- उच्च रक्तदाब रुग्णांवरील उपचार व पाठपुरावा करण्यासाठी चार जिल्ह्यांत प्रायोगिक तत्त्वावर वापरण्यात येणाऱ्या 'सिम्पल' ॲपच्या माध्यमातून आता मधुमेह रुग्णांची नोंद ठेवण्याची सुविधा. पथदर्शी प्रकल्प वर्धा जिल्ह्यात सुरू.
- कर्करोग, एच.आय.व्ही.बाधित तसेच दुर्धर आजारी असलेल्या रुग्णांची विशेष काळजी घेण्यासाठी १७ जिल्ह्यांत स्थापन झालेले विशेष उपचार केंद्र 'पॅलिएटिव्ह केअर सेंटर' येत्या दोन वर्षांत उर्वरित १९ जिल्ह्यांत सुरू करण्याचा निर्णय.



- कोरोनाबाधितांवर महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून मोफत उपचार. रुग्णांना कॅशलेस उपचाराची सुविधा.
- कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी १३ मार्च २०२० रोजी साथरोग कायदा राज्यात लागू.
- मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना.

# अन्न आणि आरोग्य

- १४ मार्च रोजी महाराष्ट्र कोरोना उपाययोजना नियम २०२० अधिसूचना लागू. त्याअंतर्गत अलगीकरण, विलगीकरणाचे नियम कार्यान्वित. रुग्णांना नाकारू नये यासाठी खासगी रुग्णालयांमध्ये पालिकेचे अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय.
- लॉकडाऊनच्या काळात नागरिकांना आरोग्य सल्ल्यासाठी मोफत ऑनलाइन ई-संजीवनी ओपीडी.




- केंद्र शासनाच्या सूचनेनुसार आता कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी रुग्णालयांची त्रिस्तरीय वर्गवारी. लक्षणे नसलेल्या रुग्णांसाठी कोरोना केअर रुग्णालये, सौम्य लक्षणे असलेल्यांसाठी कोरोना हेल्थ, तर तीव्र लक्षणे असलेल्यांकरिता कोरोना हॉस्पिटल. कोरोनामुळे होणाऱ्या मृत्यूचे विश्लेषण आणि त्याचे प्रमाण कमी करण्यासाठी मुंबई अणि परिसरासाठी तसेच उर्वरित महाराष्ट्रासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन.
- कोरोनाला रोखण्यासाठी ३८ शासकीय रुग्णालये कोरोना उपचारासाठी विशेष रुग्णालये म्हणून घोषित. वैद्यकीय शिक्षण विभागाद्वारे १७ रुग्णालये अधिसूचित.
- कोरोनासाठीच्या रुग्णालयांमध्ये ऑक्सिजन स्टेशन.
- प्लाझ्मा थेरपी उपचाराला केंद्राकडून मान्यता.
- कोरोनाच्या रुग्णांवर उपचार करताना मुंबईतील काही खासगी रुग्णालयांकडून मनमानी पद्धतीने करण्यात येणाऱ्या दर आकारणीस चाप लावण्याचा धाडसी निर्णय.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह राज्यातील सर्व खासगी व धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या रुग्णालयांमधील एकूण खाटांच्या ८० टक्के खाटा कोरोना व अन्य रुग्णांच्या उपचारासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय, खासगी रुग्णालयांना राज्य शासनाने काढलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक, यामुळे कोरोनाच्या रुग्णांना खाटा उपलब्ध होण्याबरोबरच उपचाराच्या दरावरदेखील नियंत्रण शक्य.

# अन्न आणि आरोग्य

- बीकेसी येथे एमएमआरडीमार्फत १५ दिवसांत देशातील पहिल्या खुल्या रुग्णालयाची निर्मिती.
- कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, थुंकण्यास व धूम्रपानास प्रतिबंध करण्याचा निर्णय. सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांना दंडासह शिक्षा.
- कोरोनाच्या गंभीर रुग्णांवर उपचारासाठी ‘रेमडेसीवीर’ इंजेक्शनच्या १० हजार व्हॉयल्स घेण्याचा निर्णय.



- कोरोना चाचण्यांसाठी मान्यताप्राप्त प्रयोगशाळांचे कोरोना निदान चाचणी शुल्क निश्चित करण्यासाठी चार सदस्यांची समिती गठीत.
- अतिसौम्य किंवा लक्षणे नसलेल्या कोरोना पॉझिटिव्ह व्यक्तींना गृह विलगीकरणाचा पर्याय. आरोग्य विभागाकडून मार्गदर्शक सूचना जाहीर.
- खासगी प्रयोगशाळेतील कोरोना चाचण्यांसाठी २२०० रुपये दर निश्चित, देशात सर्वात कमी दर महाराष्ट्रात.
- अतिदक्षता विभागात उपचार सुरू असलेल्या कोरोनाच्या रुग्णांसाठी विशेषज्ञांचे मार्गदर्शन आणि उपचारासाठी मुंबई, ठाणे, जळगाव, सोलापूर, औरंगाबाद, अकोला आणि जालना या ७ जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ‘टेलिआयसीयू’ सुविधेचा वापर. कोरोनासाठी करण्यात येणाऱ्या स्वॅब तपासण्यांचे जलद निदान व्हावे यासाठी रॅपिड ॲण्टिजेन तपासण्यांचा उपयोग करण्यासाठी मान्यता. केवळ १५ ते ३० मिनिटांत याद्वारे निदान.

# अन्न आणि आरोग्य

- आरोग्य विभागातील १७ हजार विविध रिक्त पदे भरण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यान्वित. वैद्यकीय शिक्षण आणि विविध महापालिकांमधील रिक्त पदे भरण्यास मान्यता.
- कोरोनामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी दोन समित्यांची नियुक्ती मुंबईसाठी स्वतंत्र समिती.
- महात्मा फुले जनारोग्य योजनेत राज्यातील १०० टक्के लोकसंख्येचा समावेश.
- राज्यात ॲण्टिजेन पाठोपाठ ॲण्टिबॉडीज् चाचण्या करण्याचा निर्णय.
- खासगी रुग्णवाहिकांच्या मनमानी दर आकारणीवर नियंत्रण.
- कोरोनाबाधितांना रुग्णालयात दाखल करण्यासाठी खासगी रुग्णवाहिका, वाहने ताब्यात घेण्याचा निर्णय.
- कोरोना रुग्णालयातील आरोग्य सुविधांच्या देखरेखीसाठी जिल्हास्तरीय समिती.
- मास्क, सॅनिटायझरच्या दर निश्चितीसाठी समिती गठीत, जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत समावेशासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा.
- आशा, गटप्रवर्तक यांच्या मोबदल्यात वाढ.
- अर्थसंकल्पातील आश्वासनाची पूर्ती, ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांना मिळणार ५०० नवीन रुग्णवाहिका.
- राज्यात कोरोनाच्या उपचारासाठी खासगी रुग्णालयांकडून आणि रुग्णवाहिकांकडून वाजवी शुल्क आकारण्याबाबत राज्य शासनाने वेळोवेळी निर्देश दिले आहेत. त्याच्या अंमलबजावणी आणि तपासणीसाठी भरारी पथके नेमली आहेत, तपासणी अहवाल तीन दिवसात शासनाला सादर करण्याच्या सूचना.
- आशा वर्कर्स व गटप्रवर्तकांच्या मानधनात वाढीचा निर्णय.

## अन्न आणि आरोग्य

### अन्न व औषध प्रशासन



- कोरोनाचा प्रादुर्भाव विचारात घेता अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्षाची व्यवस्था,जनतेच्या/रुग्णांच्या तक्रारी नोंदवून तत्काळ चौकशी,
- कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे सॅनिटायझरच्या मागणीत वाढ झाल्याने बाजारात बनावट किंवा विनापरवाना किंवा कमी दर्जाचे सॅनिटायझर उत्पादन, विक्री होऊ नये, मास्क व सॅनिटायझरचा काळा बाजार होऊ नये, यासाठी अधिकाधिक तपासणी व धाडसत्र.
- कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे सॅनिटायझरची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अल्कोहोल उत्पादक (डिस्टिलरीज) यांना एक दिवसात परवाना मंजूर करण्याचा निर्णय.
- सॅनिटायझर/मास्कच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल (अल्कोहोल, लिनॅन) चे दर वाढू नये, यासाठी दर निश्चितीसाठी केंद्र शासनाकडे केलेला पाठपुरावा यशस्वी.
- संचारबंदी/लॉकडाऊनमुळे ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी व थॅलेसेमिया रुग्णांना रक्तपुरवठा नियमित अथवा रक्ताची कमतरता येऊ नये, रक्त व रक्त घटक उपलब्ध व्हावे, यासाठी अधिकाधिक रक्तदान शिबिरांचे आयोजन.
- प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन घाऊक वितरक व १० किरकोळ औषध विक्रेत्यांकडे खासगी व्यावसायिकांसाठी माफत दरात पीपीई किट व एन-९५ मास्क किंवा या दर्जाचे इतर मास्क उपलब्ध करण्याची व्यवस्था करण्याचा निर्णय.
- योग्य किमतीत अन्नपदार्थ मुबलक प्रमाणात उपलब्ध होतील, यासाठी सर्व उत्पादक व वितरकांच्या अडचणी सोडवण्यासाठी मुख्यालय व जिल्हास्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती.
- रेमडेसीवीर (Remdesivir १०० mg Inj) व टोसीलीझुमॅब (Tocilizumab Inj) या औषधांच्या काळाबाजारास आळा घालण्यासाठी पोलीस विभागाच्या मदतीने संयुक्त कारवाई.

## मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन

- निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यासाठी रायगड जिल्ह्यासाठी ४३९ कोटी ३० हजार रुपये. रत्नागिरीसाठी  १७४ कोटी ५६ लाख ९८ हजार रुपये आणि सिंधुदुर्गसाठी ३७ लाख १९ हजार रुपये असा एकूण ६१३ कोटी ९४ लाख ४७ हजार रुपयांचा निधी वितरित.



- कोरोना विषाणूंचा राज्यातील वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता सुरू असलेल्या लॉकडाऊनदरम्यान गर्दी टाळण्याच्या दृष्टीने ५० लोकांच्या मर्यादेत सोशल डिस्टन्सिंग पाळत लग्न समारंभ साजरा करण्याची परवानगी.
- राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून ४६० कोटी रुपयांचा निधी कोविड-१९च्या उपाययोजनांसाठी वितरित.
- निसर्ग चक्रीवादळामुळे पूर्णत: नष्ट झालेल्या सुपारी व नारळाच्या झाडांना विशेष बाब म्हणून प्रति झाडाप्रमाणे वाढीव दराने मदत.



- संपूर्ण नष्ट झालेल्या सुपारीच्या प्रति झाडासाठी ५० रुपये आणि नारळ झाडासाठी २५० रुपये देण्याचा निर्णय.
- लॉकडाऊनमध्ये मजुरांच्या श्रमिक ट्रेनसाठी मुख्यमंत्री सहायता निधीमधून ९७ कोटी खर्च. तसेच एसटी बससाठी २१ कोटी राज्य शासनाकडून.
- संभाव्य पूर परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक ते साहित्य उपलब्ध करण्यासाठी गडचिरोलीसाठी एक, साताऱ्यासाठी १.५, तर कोल्हापूर जिल्ह्यासाठी २.७५ कोटी रुपये निधी उपलब्ध.

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण



- राज्यातील गरजूंसाठी २६ जानेवारीपासून शिवभोजन थाळी सुरू. या योजनेचा एप्रिलपासून तालुकास्तरावर विस्तार. दररोज एक लाख थाळ्या उपलब्ध. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गोरगरीब, शेतकरी, मजूर व विद्यार्थी उपाशी राहू नये यासाठी सप्टेंबरपर्यंत पाच रुपयांमध्ये जेवण देण्याची सुविधा.
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत समाविष्ट होऊ न शकलेल्या ३ कोटी ८ लाख एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना माहे मेपासून ऑगस्टपर्यंत अल्पदरात धान्य. केंद्र शासनाकडून २१/- रु.किलो दराने घेतलेले गहू रु. ८/- प्रति किलो तर २२/- रु. प्रतिकिलो दराने घेतलेले तांदूळ १२/- रुपये प्रतिकिलो या दराने वितरित. प्रतिमाह प्रतिव्यक्ती ३ किलो गहू व २ किलो तांदूळ याप्रमाणे ५ किलो अन्नधान्य देण्याचा निर्णय.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या पात्र ७ कोटी लाभार्थ्यांना एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत प्रतिव्यक्ती ५ किलो मोफत तांदूळ तसेच प्रतिकुटुंब एक किलो तूरडाळ किंवा चनाडाळ वितरण.
- मे आणि जूनपासून केशरी कार्डधारकांनादेखील अतिरिक्त १.५० लक्ष मे.टन धान्य वाटप केले जात असल्याने प्रतिमाह जवळपास ८.५० लक्ष मे.टन म्हणजे तीनपट धान्य वितरित करण्याचा विक्रम.
- आत्मनिर्भर योजनेंतर्गत रेशन कार्ड नसलेल्या गरजू नागरिकांना मेपासून ऑगस्टपर्यंत प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो मोफत तांदूळ वितरण.
- किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेद्वारे रब्बी हंगामातील ज्वारी व मका या भरड धान्याची हमी भावामध्ये खरेदी. या योजनेची उद्दिष्टे २.५० लाखांवरून ९ लाख क्विंटल.
- रब्बी पणन हंगामात गहू पिकासाठी राज्यात विकेंद्रित खरेदी योजना.

# प्रशासन

# प्रशासन


## महसूल



- महसूल चोरीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित आर्थिक व्यवहारांसाठी यापुढे पॅन क्रमांक अनिवार्य.
- कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कावर विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटींवरून ५० कोटींपर्यंत वाढविण्यास मंजुरी.
- प्रॉपर्टी व्यवहारांच्या नोंदणीस परवानगी.
- महसूल दिनाच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागामार्फत 'डिजिटल ८ अ' ऑनलाइन सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध.

## वित्त व नियोजन

- जीएसटी कायद्याच्या अंमलबजावणीत एकवाक्यता आणण्यासाठी अधिनियमात सुधारणा.
- तान्हाजी – द अनसंग वॉरियर चित्रपटाला करात सवलत.
- कंपन्यांना व्यवसाय कर कायद्यांतर्गत आपोआप नोंदणी दाखला.
- आयडीबीआय, प्रादेशिक ग्रामीण बँक आणि १५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना शासकीय बँकिंग व्यवहारास मान्यता.



# प्रशासन

- मराठा समाजबांधवांच्या विकासासाठी कार्यरत सारथी संस्थेची स्वायत्तता कायम ठेवण्याचा विश्वास. संस्थेसाठी 'व्हिजन २०२०', सारथीची सूत्रे नियोजन विभागाकडे, ८ कोटींचा निधी तत्काळ वितरित, इमारतीसाठी पुण्यात जमीन देण्याचा निर्णय.
- एसटी महामंडळासाठी ५५० कोटींचा निधी.
- डॉक्टर, पोलीस, अंगणवाडी ताई आदी कोरोनाविरुद्धच्या लढ्यातील सर्व योद्ध्यांसह नोंदणीकृत माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक यांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण.
- नाशिक–पुणे रेल्वेमार्गाच्या कामाला गती देण्याचा निर्णय
- 'कोरोना' प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक खर्चाला तातडीने मंजुरीसाठी आर्थिक निर्बंधातून सूट.
- कोरोनाच्या आनुषंगिक साहित्य खरेदीचे विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार.
- जिल्हा नियोजन निधीतून ५ टक्के निधी खर्च करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार.
- कोरोना संकटाच्या मुकाबल्यासाठी उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री उपसमिती कार्यरत.
- अर्थव्यवस्था पुनरुज्जीवनाच्या उपाययोजना सुचवण्यासाठी तज्ज्ञ सदस्यांची समिती स्थापन.
- 'सामाजिक न्याया'साठी १ हजार २७३ कोटी तातडीने वितरित.
- एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या सहकार्याने शिक्षण, आरोग्य क्षेत्राचे बळकटीकरण.

# प्रशासन

## संसदीय कार्य

- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता राज्यातील सर्व विधिमंडळ सदस्य, लोकप्रतिनिधींच्या वेतनात या महिन्यापासून म्हणजे एप्रिल २०२० पासून पुढील वर्षीपर्यंत म्हणजे एप्रिल २०२१ पर्यंत ३० टक्के कपात करण्याचा निर्णय.

## सामान्य प्रशासन

- अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याच्या कारणास्तव सेवा समाप्त होणाऱ्या व यापूर्वी सेवा समाप्त करण्यात आलेल्या अंदाजे ५२९८ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संख्येइतकी अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना मानवतावादी दृष्टिकोनातून तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरिता नेमणूक देण्याचा निर्णय.



- अधिकारी व कर्मचारी यांना अधिसंख्य पदांवर तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांकरिता नेमणूक दिल्यानंतर त्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवाविषयक आणि सेवानिवृत्तिविषयक लाभांबाबत सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारशी करण्यासाठी स्वतंत्र मंत्रिगटाची स्थापना करण्यात येण्याचेदेखील ठरले.
- राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू.
- माजी मुख्यमंत्री आणि जलक्रांतीचे जनक स्व. शंकरराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे 'लोकराज्य'चा विशेषांक व मराठी भाषा विभागातर्फे 'गौरवग्रंथ' प्रकाशित.
- जिल्हास्तरावर मुख्यमंत्री कार्यालये.

## माहिती तंत्रज्ञान

- महाआयटी महामंडळामार्फत 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९' च्या डिजिटल अंमलबजावणीसाठी ऑनलाइन पोर्टलचा विकास. या पोर्टलचा वापर करून बँकांमार्फत ३४ लाखांहून अधिक कर्ज खात्यांच्या रेकॉर्ड/नोंदी अपलोड. ३१ लाखाहून अधिक कर्ज नोंदींवर प्रक्रिया पूर्ण.
- या ऑनलाइन पोर्टलद्वारे बँक, आपले सरकार सेवा केंद्र, शिधावाटप दुकानांमध्ये शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध. आतापर्यंत २९ लाखांहून अधिक शेतकऱ्यांकडून आधार प्रमाणिकरण पूर्ण. नोडल बँकेद्वारे २६ लाखाहून अधिक कर्ज खात्यात १७ हजार ८० कोटी रकमेचे वितरण पूर्ण.

# प्रशासन

- साथीच्या आजारामुळे टाळेबंदीनंतर कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कामगारांची औद्योगिक मागणी पूर्ण करण्यासाठी महाआयटीमार्फत उद्योग, कामगार व कौशल्य विकास विभागासाठी महाजॉब्स पोर्टल आणि मोबाइल ॲप विकसित. यामुळे स्थानिक नोकरीसाठी अर्ज करणे व बायोडाटा अद्ययावत करणे सुलभ. गेल्या एक महिन्यापासून १२ हजार ७०० हून अधिक बेरोजगारांमार्फत पोर्टलवर नोंदणी. २ हजारहून अधिक उद्योगांमार्फत रोजगार संधीची नोंद.
- महाराष्ट्र सेक्युरिटी ऑपरेशन सेंटर आणि सी.ई.आर.टी. या सेंटरमुळे सायबर सुरक्षिततेच्या अनुषंगाने ३०० हून अधिक संकेतस्थळे व ॲप्लिकेशनवर नजर ठेवता येणे शक्य.
- हॉस्पिटल मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम – वैद्यकीय शिक्षण व औषध संचालनालयासाठी या यंत्रणेचा विकास. रुग्णालयाचे व्यवस्थापन व रुग्णांच्या नोंदणीसाठी समन्वय व सुलभता आणणारी क्लाऊड आधारित यंत्रणा. ठाणे महानगरपालिकेच्या नव्याने सुरू झालेल्या कोविड रुग्णालयात ही यंत्रणा १ जून २०२० पासून कार्यरत.
- राज्याच्या माहिती तंत्रज्ञान धोरणाला मुदतवाढ.





# संत गाडगेबाबांची दशसूत्री

भुकेलेल्यांना • अन्न
तहानलेल्यांना • पाणी
उघड्यानागड्यांना • वस्त्र
गरीब मुलामुलींना • शिक्षणासाठी मदत
बेघरांना • निवारा, आश्रय
अंध, पंगू, रोग्यांना • औषधोपचार
बेकारांना • रोजगार
पशुपक्षी, मुक्या प्राण्यांना • अभय
गरीब तरुणतरुणींचे • लग्न
दु:खी व निराशांना • हिंमत

"गाडगेबाबांच्या या शिकवणीनुसार आमचे शासन काम करणार आहे."

उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

प्रकाशक : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

ऑगस्ट २०२०

www.mahasamvad.in | Follow : /MahaDGIPR | Subscribe : MaharashtraDGIPR